26 FEB 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शिवस्पंदन सांस्कृतिक महोत्सवाच्या सर्वसाधारण विजेतेपदाचा चषक संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागास प्रदान करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत मान्यवर आणि अधिविभागाचे विद्यार्थी-विद्यार्थिनी.

# संगीत-नाट्यशास्त्र विभागाची विजयाची हॅट्ट्रिक

कोल्हापूर, ता. २५ : शिवाजी विद्यापीठाच्या शिवस्पंदन सांस्कृतिक महोत्सवात सलग तिसऱ्या वर्षी सर्वसाधारण विजेतेपद मिळवित संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाने आज हॅट्ट्रिक नोंदविली. या विभागाच्या विद्यार्थ्यांनी शोभायात्रेसह एकल नृत्य, नकला, रांगोळी, स्थळचित्रण, सुगम गायन, लघुनाटिका, समूहगीत आणि समूहनृत्य प्रकारांत प्रथम क्रमांक मिळविला.

विद्यापीठात शिकणाऱ्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांनी प्रथमच शिवस्पंदन महोत्सवात केलेले सादरीकरण आजच्या अखेरच्या दिवसाचे तसेच महोत्सवाचेही वैशिष्ट्य ठरले. राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात एकल नृत्य, समूहनृत्य स्पर्धा झाली. श्रद्धा शुक्ला हिने नजाकतीने सादर केलेल्या ठसकेबाज लावणीला आणि संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या दीपनृत्याला उपस्थितांची प्रचंड दाद मिळाली. त्याखेरीज जोगवा नृत्य, वारकरी नृत्य, तांडव नृत्य आदी सादरीकरणांनाही उत्तम प्रतिसाद लाभला. दरम्यान, स्पर्धेत विजेत्या ठरलेल्या अधिविभागांमध्ये संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागासह राज्यशास्त्र, अन्न व तंत्रज्ञान, भूगोल, मास कम्युनिकेशन, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट, तंत्रज्ञान, रसायनशास्त्र, एम.बी.ए., पर्यावरणशास्त्र, समाजशास्त्र, वाणिज्य व व्यवस्थापन, सूक्ष्मजीवशास्त्र विभागांचा समावेश आहे.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील शिवस्पंदन महोत्सवात सादर झालेल्या दीपनृत्याने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

26 FEB 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संगीत, नाट्यशास्त्र अधिविभागाची हॅटट्रिक

## शिवस्पंदन सांस्कृतिक महोत्सव : कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पारितोषिक वितरण




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील शिवस्पंदन सांस्कृतिक महोत्सवाच्या सर्वसाधारण विजेतेपदाचा चषक संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागास प्रदान करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या शिवस्पंदन सांस्कृतिक महोत्सवात सलग तिसऱ्या वर्षी सर्वसाधारण विजेतेपद मिळवित संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाने हॅटट्रिक नोंदविली आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते शिवस्पंदन महोत्सवाचे पारितोषिक वितरण करण्यात आले.

शिवाजी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी शोभायात्रेसह एकल नृत्य, नकला, रांगोळी, स्थळचित्रण, सुगम गायन, लघुनाटिका, भारतीय समूहगीत आणि समूहनृत्य प्रकारांत प्रथम क्रमांक मिळवित सर्वसाधारण विजेतेपदावर सलग तिसऱ्यांदा आपले नाव कोरले. श्रद्धा शुक्ला हिने नजाकतीने सादर केलेल्या ठसकेबाज लावणीला आणि संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या दीपनृत्याला उपस्थितांची प्रचंड दाद मिळाली. त्याखेरीज जोगवा नृत्य, वारकरी नृत्य, तांडव नृत्य आदी सादरीकरणांनाही उत्तम प्रतिसाद लाभला. यावेळी विद्यापीठातील सर्व अधिकारी उपस्थित होते.

स्पर्धेचा निकाल– शोभायात्रा –प्रथम : संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, द्वितीय : राज्यशास्त्र अधिविभाग, तृतीय : अन्न व तंत्रज्ञान अधिविभाग, उत्तेजनार्थ भूगोल अधिविभाग, उत्तेजनार्थ मास कम्युनिकेशन अधिविभाग. लोकवाद्यवादन (एकल) – प्रथम : यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट अधिविभाग, द्वितीय : संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, तृतीय : संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, उत्तेजनार्थ अन्न व तंत्रज्ञान अधिविभाग, तंत्रज्ञान अधिविभाग. एकल नृत्य – प्रथम : संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, द्वितीय : राज्यशास्त्र अधिविभाग, तृतीय : संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, उत्तेजनार्थ संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, रसायनशास्त्र अधिविभाग.. नकला – प्रथम : संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, द्वितीय : एम.बी.ए.अधिविभाग, तृतीय : अन्न व तंत्रज्ञान अधिविभाग, उत्तेजनार्थ : पर्यावरणशास्त्र अधिविभाग. रांगोळी – प्रथम : संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, द्वितीय : समाजशास्त्र अधिविभाग, तृतीय : समाजशास्त्र अधिविभाग, उत्तेजनार्थ रसायनशास्त्र अधिविभाग, वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभाग. स्थळचित्र – प्रथम : संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, द्वितीय : संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, तृतीय : यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट अधिविभाग,

उत्तेजनार्थ रसायनशास्त्र अधिविभाग, तंत्रज्ञान अधिविभाग. सुगम गायन – प्रथम : संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, द्वितीय : संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, तृतीय : समाजशास्त्र अधिविभाग, उत्तेजनार्थ सूक्ष्मजीवशास्त्र अधिविभाग, संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग. लघुनाटिका – प्रथम : संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, द्वितीय : पर्यावरणशास्त्र अधिविभाग, तृतीय : एम.बी.ए. अधिविभाग, उत्तेजनार्थ अन्न व तंत्रज्ञान अधिविभाग, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट अधिविभाग. मूकनाट्य – प्रथम : अन्न व तंत्रज्ञान अधिविभाग, द्वितीय : संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, तृतीय : पर्यावरणशास्त्र अधिविभाग, उत्तेजनार्थ: भूगोल अधिविभाग. भारतीय समूहगीत – प्रथम : संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, द्वितीय : पर्यावरणशास्त्र अधिविभाग, तृतीय : अन्न व तंत्रज्ञान अधिविभाग; उत्तेजनार्थ: रसायनशास्त्र अधिविभाग. समूहनृत्य – प्रथम : संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, द्वितीय : अन्न व तंत्रज्ञान अधिविभाग, तृतीय : पर्यावरणशास्त्र अधिविभाग, उत्तेजनार्थ वनस्पतीशास्त्र अधिविभाग, भूगोल अधिविभाग.

26 FEB 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लावणी नृत्याने पोलंडच्या तरुणाईने जिंकली मने

## राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्राचा लावणी हा नृत्यप्रकार पाहण्यास जितका सोपा, सादरीकरणास मात्र तितकाच अवघड. त्यातली नजाकत, अदाकारी, ठेका हे सारेच वेगळे; मात्र पोलंडच्या युवक-युवतींनी शिवाजी विद्यापीठाच्या युवा कलाकारांसमवेत लावणी नृत्यात घेतलेला सहभाग पाहून सारेच चकीत झाले अन् आनंदलेही. या सादरीकरणाने त्यांनी उपस्थितांची मने जिंकली.




पोलंड या देशाचे युवा शिष्टमंडळ सध्या भारताच्या शैक्षणिक-सांस्कृतिक दौऱ्यावर आहे. वळीवडेसह कोल्हापूर परिसरातील आपल्या पूर्वजांच्या स्मृती जागवण्यासाठी, त्यांच्याप्रती आदरांजली वाहण्यासाठी पोलंडच्या राजशिष्टाचार अधिकाऱ्यांसह नागरिक अतिशय भावनापूर्ण आत्मियतेने येथे येत असतात. यंदाही २१ युवक-युवतींचे शिष्टमंडळ कोल्हापूरमध्ये आले असून, त्यांनी या भेटीअंतर्गत सोमवार, दि. २४ रोजी शिवाजी विद्यापीठास भेट देऊन राष्ट्रीय सेवा योजनेसह विविध अधिविभागांतील विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला.

राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या कार्यक्रमावेळी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने काही सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण केले. यावेळी एक विद्यार्थिनी लावणी नृत्य सादर करत असताना शिष्टमंडळातील काही कलाकार तिच्या नृत्यात सामील झाले. तिच्याप्रमाणे लावणी करण्याचा त्यांनी अत्यंत यशस्वी प्रयत्न केला. त्यांच्या या सहनृत्याविष्काराने सर्वच उपस्थितांची मने त्यांनी जिंकून घेतली. या संवादानंतर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनीही शिष्टमंडळातील विद्यार्थ्यांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी भारत सरकारच्या युवा व क्रीडा मंत्रालयाचे यूथ ऑफिसर सुमंतकुमार यादव यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सहायक कक्ष अधिकारी कपिल कुमार यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी रोहित आनंद, भरत चव्हाण उपस्थित होते. पोलंडच्या शिष्टमंडळात हेलेना कँटरझिना, सँड्रा सँनियर, पिटर डॅनिकी, मिया स्प्लिट, ओलीविया कोलासा, जाकुब सेरेडेनस्की, अन्टोनी सेरेडेनस्की, वॅरोनिका वॅलुपिक, वॅरोनिका ड्रोड, कॉन्स्टॅन्टी क्सुबिकी, डॉमिनिकी गिझिकी, पॅटरिझा चोडोरोवॉस्का आदींचा समावेश होता. डॉ. तानाजी चौगुले यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 FEB 2025
Times of India

# SUK's Shivspandan fest ends with vibrant celebrations

TOI




Foreign students perform their traditional dance

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The three-day 'Shivspandan' cultural festival organized by Shivaji University's Student Development Board concluded on a high note on Tuesday. The event featured a range of cultural competitions, including folk music, folk dance, mime, skits, drama, classical singing, group singing, and rangoli, all held on the SUK premises. The festival wrapped up in the presence of vice-chancellor Dr D T Shirke, pro vice-chancellor Dr Pramod Patil, along with other dignitaries and students.

A key highlight of the event was the musical festival, where various traditional folk instruments were showcased.

The festival began on Sunday with a colourful procession rally. The procession highlighted several important themes like rural and agricultural culture, film shooting, the eradication of child labor, tobacco consumption and cancer, the importance of Yoga-Pranayam, social harmony, and the elimination of female foeticide, all presented by the students.

A youth delegation from Poland, currently on an educational-cultural tour of India to honor their forefathers who sought refuge in Valiwade, Kolhapur, during the Second World War, visited Shivaji University on Tuesday. During their visit, the delegation interacted with students from various departments and the National Service Scheme.

A cultural program was held for the visiting delegation, and when Lavani, a traditional folk dance of Maharashtra, was performed, several members of the Polish delegation couldn't resist joining in the dance and learning some Lavani dance steps.

26 FEB 2025 लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




शिवाजी विद्यापीठातील शिवस्पंदन महोत्सवात विद्यार्थ्यांनी दीपनृत्य सादर करून सर्वांचे लक्ष वेधले.

26 FEB 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पोलंडच्या तरुणाईने जिंकली मने

## 'लावणी'चे सादरीकरण : विद्यापीठात विद्यार्थ्यांशी साधला संवाद

कोल्हापूर, ता. २५ : महाराष्ट्राचा लावणी हा नृत्यप्रकार पाहण्यास जितका सोपा, सादरीकरणास मात्र तितकाच अवघड. त्यातली नजाकत, अदाकारी, ठेका हे सारेच वेगळे. मात्र, पोलंडच्या युवक, युवतींनी मात्र शिवाजी विद्यापीठाच्या युवा कलाकारांसमवेत लावणी नृत्यात घेतलेला सहभाग पाहून सारेच चकित झाले आणि आनंदलेही. या सादरीकरणाने त्यांनी उपस्थितांची मने जिंकली.

पोलंड देशाचे युवा शिष्टमंडळ सध्या भारताच्या शैक्षणिक-सांस्कृतिक दौऱ्यावर आहे. वळिवडेसह कोल्हापूर परिसरातील आपल्या पूर्वजांच्या स्मृती जागविण्यासाठी, त्यांच्याप्रति आदरांजली वाहण्यासाठी पोलंडच्या राजशिष्टाचार अधिकाऱ्यांसह नागरिक अतिशय भावनापूर्ण आत्मीयतेने येथे येत असतात. यंदाही २१ युवक-युवतींचे शिष्टमंडळ कोल्हापूरमध्ये आले असून, त्यांनी या भेटीअंतर्गत काल सोमवारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात लावणी नृत्य सादर करणाऱ्या विद्यार्थिनींसमवेत नृत्यात सहभागी झालेले पोलंडचे युवक-युवती.

विद्यापीठास भेट देऊन राष्ट्रीय सेवा योजनेसह विविध अधिविभागांतील विद्यार्थ्यांशी अत्यंत मनमोकळा संवाद साधला.

राजर्षी शाहू सभागृहातील सांस्कृतिक कार्यक्रमात एक विद्यार्थिनी लावणी नृत्य सादर करीत असताना शिष्टमंडळातील काही कलाकार तिच्या नृत्यात सामील झाले. तिच्याप्रमाणे लावणी करण्याचा त्यांनी अत्यंत यशस्वी प्रयत्न केला.

दरम्यान, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनीही शिष्टमंडळातील विद्यार्थ्यांसमवेत संवाद साधला. यावेळी भारत सरकारच्या युवा व क्रीडा मंत्रालयाचे यूथ ऑफिसर सुमंतकुमार यादव यांनी स्वागत केले. सहायक कक्ष अधिकारी कपिल कुमार यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी रोहित आनंद, भरत चव्हाण उपस्थित होते. पोलंडच्या शिष्टमंडळात हेलेना कॅटरझिना, सँड्रा सॅनियर, पिटर डॉनिकी, मिया स्प्लिट, ओलीविया कोलासा, जाकूब सेरेडेनस्की, अन्टोनी सेरेडेनस्की, वॅरोनिका वॅलूपिक, वॅरोनिका ड्रोड, कॉन्स्टॅन्टी क्सूविकी, डॉमिनिकी गिझीकी, पॅटरिझा चोडोरोवॉस्का आदींचा समावेश होता. विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी आभार मानले.

### भारत-पोलंडमध्ये सांस्कृतिक साम्य

यावेळी उपस्थित भारतीय विद्यार्थ्यांशी शिष्टमंडळातील तरुणाईने आत्मीयतेने संवाद साधला. पोलंडचे भारताशी भावनिक नाते असून, या दोन्ही देशांत बरेचसे सांस्कृतिक साम्य असल्याचे शिष्टमंडळातील युवकांनी सांगितले. पोलंडमध्ये हिंदी चित्रपट आवडीने पाहिले जातात आणि अमिताभ बच्चन, शाहरूख खान आणि सलमान खान हे तेथील तरुणाईतही लोकप्रिय असल्याचे त्यांनी सांगितले. शिष्टमंडळातील काही विद्यार्थी हिंदी आणि संस्कृतही शिकत असून त्यांनी काही संस्कृत श्लोकही यावेळी सादर केले.

26 FEB 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लावणीच्या ठेक्यावर पोलंडवासीय थिरकले

## पोलंड युवक-युवतींची शिवाजी विद्यापीठाला भेट

प्रतिनिधी
कोल्हापूर

महाराष्ट्राचा लावणी हा नृत्यप्रकार पाहण्यास जितका सोपा, सादरीकरणास मात्र तितकाच अवघड. त्यातली नजाकत, अदाकारी, ठेका हे सारेच वेगळे. शिवाजी विद्यापीठातील कलाकारांसोबत पोलंडच्या युवक, युवती लावणीच्या ठेक्यावर थिरकल्या. लावणीच्या सादरीकरणाने त्यांनी उपस्थितांची मने जिंकली.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात लावणीच्या ठेक्यावर नृत्याविष्कार करताना पोलंडचे युवक-युवती.**

पोलंडचे युवा शिष्टमंडळ सध्या भारताच्या शैक्षणिक-सांस्कृतिक दौऱ्यावर आहे. वळिवडेसह कोल्हापूर परिसरातील आपल्या पूर्वजांच्या स्मृती जागविण्यासाठी, त्यांच्याप्रती आदरांजली वाहण्यासाठी पोलंडच्या राजशिष्टाचार अधिकाऱ्यांसह नागरिक अतिशय भावनापूर्ण आत्मियतेने येथे येत असतात.

यंदाही २१ युवक- युवतींचे शिष्टमंडळ कोल्हापूरमध्ये आले असून त्यांनी या भेटीअंतर्गत शिवाजी विद्यापीठास भेट देऊन राष्ट्रीय सेवा योजनेसह विविध अधिविभागांतील विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

राजर्षी शाहू सभागृहात राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण केले. एक विद्यार्थिनी लावणी नृत्य सादर करीत असताना शिष्टमंडळातील काही कलाकार तिच्या नृत्यात सामील झाले. तिच्याप्रमाणे लावणी करण्याचा त्यांनी अत्यंत यशस्वी प्रयत्न केला. त्यांच्या या सहनृत्याविष्काराने सर्वच उपस्थितांची मने त्यांनी जिंकली.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनीही शिष्टमंडळातील विद्यार्थ्यांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला. भारत सरकारच्या युवा व क्रीडा मंत्रालयाचे यूथ ऑफिसर सुमंतकुमार यादव यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सहाय्यक कक्ष अधिकारी कपिल कुमार यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी आभार मानले.

### 'भारत-पोलंडमध्ये सांस्कृतिक साम्य'

भारतीय विद्यार्थ्यांशी शिष्टमंडळातील तरुणाईने आत्मियतेने संवाद साधला. पोलंडचे भारताशी भावनिक नाते असून या दोन्ही देशांत बरेचसे सांस्कृतिक साम्य आहे. या दोन्ही देशांमधील राजकीय, सामाजिक संबंध अत्यंत दृढ स्वरुपाचे आहेत. पोलंडमध्ये हिंदी चित्रपट आवडीने पाहिले जातात आणि अमिताभ बच्चन, शाहरूख खान आणि सलमान खान हे तेथील तरुणाईतही लोकप्रिय असल्याचे त्यांनी सांगितले.

पोलंडच्या शिष्टमंडळात हेलेना कॅटरझिना, सँड्रा सॅनियर, पिटर डॅनिकी, मिया स्प्लिट, ओलीविया कोलासा, जाकूब सेरेडेनस्की, अन्टोनी सेरेडेनस्की, वॅरोनिका वॅ लूपिक, वॅरोनिका ड्रोड, कॉन्स्टॅन्टी क्सूबिकी, डॉमिनिकी गिझीकी, पॅटरिझा चोडोरोवॉस्का आदींचा समावेश होता.

26 FEB 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाश्वत विकासासाठी सामूहिक प्रयत्न महत्त्वाचे

## प्र कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचे प्रतिपादन : वारणा महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान परिषदेचा समारोप

प्रतिनिधी
वारणानगर

शाश्वत विकास साध्य करण्यासाठी व्यक्ती, उद्योग आणि सरकार यांचे सामूहिक प्रयत्न महत्त्वाचे आहेत, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ.पी.एस. पाटील यांनी केले.

वारणानगर येथील यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयाच्या हीरक महोत्सवी वर्षानिमित्त दोन दिवसीय राष्ट्रीय विज्ञान परिषदेचा समारोप प्रमुख पाहुणे शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते झाला. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी वारणा विभाग शिक्षण मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. व्ही. व्ही. कार्जीन्नी होते. राष्ट्रीय विज्ञान परिषदेचे संयोजक तथा महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. ए. एम. शेख, परिषदेचे समन्वयक डॉ. बी. एस. शिर्के, संघटन सचिव डॉ. एस. एस. खोत, पीएम–उषा समन्वयक प्रा. व्ही. एस. पाटील तसेच विज्ञान विषयातील तज्ज्ञ, संशोधक, शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

राष्ट्रीय परिषदेच्या दुसऱ्या दिवशी सकाळच्या प्रहरामध्ये मौखिक संशोधन पत्रिका सादरीकरण झाले. यासाठी परिक्षक म्हणून रसायनशास्त्र आणि पदार्थविज्ञान यासाठी डॉ. पी. बी. पिस्ते, व डॉ. आर. डी. माने तसेच जैवविज्ञान शास्त्रासाठी डॉ. एस. एस. वाडकर, व डॉ. एस. ए. व्हानाळकर यांनी काम पाहिले. गणित व संगणकीय शास्त्रासाठी डॉ. एस. टी. दिंडे यांनी परिक्षक म्हणून काम केले. या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेमध्ये एकूण २७५ शोधनिबंधाचे सादरीकरण झाले.

प्रथम सत्रामध्ये प्रा. डॉ.आर.बी. पवार, शास्त्रज्ञ–जी, डीआरडीओ, पुणे यांनी विद्यार्थ्यांना केमिस्ट्री अँड सस्टेनेबल एनर्जी रोल ऑफ करंट अँड फ्युचर जनरेशन या विषयावर मार्गदर्शन केले.

दुसऱ्या सत्रामध्ये प्रा. डॉ. एस. आर. यादव आयएनएसए मानद शास्त्रज्ञ, वनस्पतिशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी विद्यार्थ्यांना रोल ऑफ प्लांट सायन्सेस इन २१ सेंचुरी या विषयावर मार्गदर्शन केले.

यानंतर बक्षीस समारोह मान्यवरांच्या हस्ते पार पडला. यामध्ये पोस्टर सादरीकरणासाठी रसायनशास्त्र आणि पदार्थ विज्ञानामध्ये प्रथम क्रमांक आफताब गडकरी, द्वितीय क्रमांक आकांक्षा जगताप आणि तृतीय क्रमांक शिल्पा पाटील तसेच मौखिक सादरीकरणासाठी प्रथम क्रमांक रोहिणी संगणवार, द्वितीय क्रमांक संदीप पिसे आणि तृतीय क्रमांक अरविंद पाटील यांना मिळाला. यानंतर पोस्टर सादरीकरणासाठी जैवविज्ञान शास्त्रासाठी प्रथम क्रमांक स्वाती पवार, द्वितीय क्रमांक आकांक्षा सावंत आणि तृतीय क्रमांक ए. ए. पेंढारी तसेच मौखिक सादरीकरणासाठी प्रथम क्रमांक सना चौगुले, द्वितीय क्रमांक शकील शेख आणि तृतीय क्रमांक श्वेता साळोखे यांना मिळाले. यानंतर पोस्टर सादरीकरणासाठी गणित आणि संगणकी य. शास्त्रासाठी प्रथम क्रमांक अनुराधा घोरपडे, द्वितीय क्रमांक शुभम गिरीगोसावी तसेच मौखिक सादरीकरणासाठी प्रथम क्रमांक मारलोन सिक्वेरिया, द्वितीय क्रमांक संजय मोरे आणि तृतीय क्रमांक जीवन परब यांना प्राप्त झाला.



वारणानगर : येथील राष्ट्रीय परिषदेत बोलताना शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. सोबत डॉ. एस. एस. खोत, प्राचार्य डॉ. ए. एम. शेख, शिक्षण मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. व्ही. व्ही. कार्जीन्नी, डॉ. बी. एस. शिर्के.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 FEB 2025

लोकमत

# विद्यापीठात उद्यापासून 'स्पार्क' फिल्म फेस्टिव्हल

## राष्ट्रीय, फिल्मफेअर पुरस्कार प्राप्त लघुपटांचे स्क्रिनिंग

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या बी. ए. फिल्म मेकिंग कोर्सच्यावतीने २७ आणि २८ फेब्रुवारीला दोन दिवसीय 'स्पार्क' फिल्म फेस्टिव्हलचे आयोजन केले आहे. फेस्टिव्हलमध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त आणि फिल्मफेअर पुरस्कार प्राप्त लघुपट व माहितीपटांचे स्क्रिनिंग करण्यात येणार आहे. यावेळी उपस्थित प्रेक्षकांशी माहितीपट व लघुपटांचे दिग्दर्शक संवाद साधणार आहेत.

कुलगुरू प्रा. डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते गुरुवारी सकाळी साडेदहा वाजता फेस्टिव्हलचे उद्घाटन होणार आहे. हा फेस्टिव्हल विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागात होणार आहे.

दोन दिवस चालणाऱ्या फेस्टिव्हलमध्ये सचिन सूर्यवंशी यांच्या 'वारसा' आणि 'सॉकर सिटी', संजय दैव यांचा 'देशकरी', रोहित कांबळे यांचा 'देशी', मेधप्रणव पोवार यांची 'हॅपी बर्थ डे', नीतेश परुळेकर यांचा 'बॅकयार्ड', उमेश बगाडे यांची 'अनाहूत', सुधीर गुरव यांची 'लागीर', स्वप्निल पाटील यांचा 'मधुबाला' आणि उमेश बोळगे यांचा 'काजवा' आदी लघुपट आणि माहितीपटांचा समावेश आहे. लघुपट व माहितीपट पाहण्यासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 FEB 2025

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात उद्यापासून 'स्पार्क' फिल्म फेस्टिव्हल

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या बी.ए. फिल्म मेकिंग कोर्सच्या वतीने दि. २७ व २८ फेब्रुवारी रोजी दोनदिवसीय 'स्पार्क' फिल्म फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आले आहे.

फेस्टिव्हलमध्ये जिल्ह्यातील राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त व फिल्मफेअर पुरस्कारप्राप्त लघुपट व माहितीपटांचे स्क्रीनिंग करण्यात येणार आहे. उपस्थित प्रेक्षकांशी माहितीपट व लघुपटांचे दिग्दर्शक संवाद साधणार आहेत. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते दि. २७ रोजी सकाळी १०.३० वाजता फेस्टिव्हलचे उद्घाटन होईल. फेस्टिव्हल विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागात होणार आहे. दोन दिवस चालणाऱ्या फेस्टिव्हलमध्ये सचिन सूर्यवंशी यांच्या 'वारसा' आणि 'सॉकर सिटी', संजय दैव यांचा 'देशकरी', रोहित कांबळे - 'देशी',



- जिल्ह्यातील विविध पुरस्कारप्राप्त लघुपट, माहितीपटांचे होणार स्क्रीनिंग

मेघप्रणव पोवार - 'हॅपी बर्थडे', नितेश परुळेकर - 'बॅकयार्ड', उमेश बगाडे - 'अनाहूत', सुधीर गुरव - 'लागीर', स्वप्निल पाटील - 'मधुबाला' आणि उमेश बोळगे - 'काजवा' आदी लघुपट व माहितीपटांचा समावेश आहे. महोत्सव सर्वांसाठी खुला असून, पाहण्यासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन बी.ए. फिल्म मेकिंग कोर्सचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 FEB 2025
सकाळ

# विद्यापीठात उद्यापासून 'स्पार्क' फिल्म फेस्टिव्हल

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या बी. ए. फिल्म मेकिंग कोर्सतर्फे गुरुवारी (ता. २७) आणि शुक्रवारी (ता. २८) 'स्पार्क' फिल्म फेस्टिव्हल होणार आहे. फेस्टिव्हलमध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त आणि फिल्मफेअर पुरस्कारप्राप्त लघुपट व माहितीपटांचे स्क्रिनिंग करण्यात येणार आहे. शिवाय यावेळी उपस्थित प्रेक्षकांशी माहितीपट, लघुपटांचे दिग्दर्शक संवाद साधणार आहेत. विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागात होणाऱ्या या फेस्टिव्हलचे उद्घाटन गुरुवारी सकाळी साडेदहा वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होईल. या फेस्टिव्हलमध्ये सचिन सूर्यवंशी (वारसा, सॉकर सिटी), संजय दैव (देशकरी), रोहित कांबळे (देशी), मेघप्रणव पोवार (हॅपी बर्थ डे), नीतेश परुळेकर (बॅकयार्ड), उमेश बगाडे (अनाहूत), सुधीर गुरव (लागीर), स्वप्नील पाटील (मधुबाला), उमेश बोळगे (काजवा) आदींचे लघुपट आणि माहितीपटांचा समावेश आहे. हा महोत्सव सर्वांसाठी खुला असल्याचे डॉ. शिवाजी जाधव यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 FEB 2025
तरुण भारत

# विद्यापीठात उद्यापासून 'स्पार्क' फिल्म फेस्टिव्हल

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात २७ ते २८ फेब्रुवारी दोन दिवसीय 'स्पार्क' फिल्म फेस्टिव्हलचे आयोजन केले आहे. फेस्टिव्हलमध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त आणि फिल्मफेअर पुरस्कार प्राप्त लघुपट व माहितीपटांचे स्क्रिनिंग करण्यात येणार आहे. शिवाय यावेळी उपस्थित प्रेक्षकांशी माहितीपट व लघुपटांचे दिग्दर्शक संवाद साधणार आहेत.

या फेस्टिव्हलमध्ये सचिन सूर्यवंशी यांच्या 'वारसा' आणि 'सॉकर सिटी', संजय दैव यांची 'देशकरी', रोहित कांबळे यांची 'देशी', मेधप्रणव पोवार यांची 'हॅपी बर्थ डे', नितेश परुळेकर यांची 'बॅकयार्ड', उमेश बगाडे यांची 'अनाहूत', सुधीर गुरव यांची 'लागीर', स्पनिल पाटील यांची 'मधुबाला' आणि उमेश बोळगे यांची 'काजवा' आदी लघुपट आणि माहितीपटांचा समावेश आहे.

दिग्दर्शकांशी संवाद साधण्यसासाठी प्रेक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन बी. ए. फिल्म मेकिंग कोर्सचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.